# MENU

| SR.NO. | ITEM | QUANTITY | PRICE |
|---|---|---|---|
| ०१ | TEA | १००ml. | |
| ०२ | COFFEE | १००ml. | |
| ०३ | MILK | १००ml. | |
| ०४ | IDLI | २ piece | |
| ०५ | DOSA | १ piece | |
| ०६ | MEDU WADA | २ piece | |
| ०७ | MISAL PAV | (२ piece) १००gm. | |
| ०८ | BREAD PAKODA | २ piece | |
| ०९ | SAMOSA | २ piece | |
| १० | WADA PAV | २ piece | |
| ११ | KACHORI | २ piece | |
| १२ | UPAMA | २०० gm. | |
| १३ | POHA | २००gm. | |
| १४ | SABUDANA WADA | २ piece | |
| १५ | SABUDANA KHICHADI | २००gm. | |
| १६ | VEGG PUFF | २०० gm. | |
| १७ | PURI BHAJI | (५ piece) ८०gm. | |
| १८ | FINGER CHIPS | १०० gm. | |
| १९ | SANDWICH | २ piece | |
| २० | LUNCH (Thali) | Roti-३, Rice, Dal,Vegetable (Seasonal Green veg.), Salad,Dahi,Sweet | |
| २१ | CHAPATI | १ piece | |
| २२ | VEG BIRYANI | Per Plate (२००gm.) | |
| २३ | VEG PULAV | Per Plate (२००gm.) | |
| २४ | DAL FRY | Per Plate (२००gm.) | |
| २५ | BAINGAN MASALA | Per Plate (२००gm.) | |
| २६ | MATKY MASALA | Per Plate (२००gm.) | |
| २७ | SEV BHAJI | Per Plate (२००gm.) | |
| २८ | PANEER MASALA | Per Plate (२००gm.) | |
| २९ | SHEVGA MASALA | Per Plate (२००gm.) | |
| ३० | KAJU MASALA | Per Plate (२००gm.) | |
| ३१ | ALOO MUTTER | Per Plate (२००gm.) | |
| ३२ | CHANA MASALA | Per Plate (२००gm.) | |
| ३३ | PALAK PANEER | Per Plate (२००gm.) | |
| ३४ | BHENDY MASALA | Per Plate (२००gm.) | |
| ३५ | ALOO JEERA | Per Plate (२००gm.) | |
| ३६ | RICE | Per Plate (२००gm.) | |

**(पोलीस उप आयुक्त,मुख्या., यांचे मान्यतेने)**

**( मनोज पगारे )**
**सहाय्यक पोलीस आयुक्त( प्रशासन )**
**पोलीस आयुक्तालय छत्रपती संभाजीनगर.**

उपकरण यांचे मुल्य निविदाधारक यांचेकडून वसुल करण्यात येईल. तसेच सदर साहित्याचे दुरुस्तीचा खर्च निविदाधारक करतील.

11. पोलीस उपहारगृहातील खाद्य पदार्थ / पेयांचा दर्जा चांगली नसल्यास निविदाधारक कोणत्याही वेळी करारनामा रद्द करण्यात येईल. तसे अधिकार या कार्यालयाकडे राहतील.
12. निविदाधारकास सर्व खाद्यपदार्थांच्या परिमाणासह दरांचा तक्ता दर्शनी भागात लावणे बंधनकारक राहील.
13. दरपत्रका मध्ये अ.क्र. ०१ ते ३६ मधिल सर्व खाद्यपदार्थाचे दर सादर करणे बधंनकारक आहे.
14. निविदाधारक यांनी उपहारगृह चालविण्याच्या परवान्याची (फुड लायसन्स) छायांकित प्रत पोलीस आयुक्त कार्यालयास कराराच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील.
15. उपहारगृहाची स्वच्छता ठेवणे (Hygiene Maintain) करणे निविदा धारकास बंधनकारक असेल.
16. पोलीस उपहारगृहात फक्त पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे करिता लागणारे अन्न शिजवले जाईल. बाहेर देणेकरिता लागणारे अन्न शिजवले जाणार नाही वा जागेचा अन्य व्यवसायिक वापर करता येणार नाही.
17. सा.बा.विभाग यांनी ठरवुन दिलेले मासिक भाडे दरमहाच्या ०५ तारखेच्या आत पोलीस आयुक्त कार्यालयात जमा करणे निविदाधारक यांचेवर बंधनकारक राहील अन्यथा मासिक भाडे रक्कमेस प्रति आठवडा विलंब शुल्क २% प्रमाणे आकारुन वसुल करण्यात येईल.
18. निविदाधारकास रुपये ७५,०००/- इतकी अनामत रक्कम जमा करावी लागेल.
19. सोबत दिलेल्या मेनु प्रमाणे सिलबंद दरपत्रके पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर मिल कॉर्नर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, छत्रपती संभाजीनगर यांचे नावे सादर करण्यात यावी.
20. वरील प्रमाणे अटी / शर्तीत वाढ करण्याचा, बदल करण्याचा, दरपत्रक नाकारण्याचा अधिकार पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांना राहील.

//पोलीस उप आयुक्त,(मुख्या.) यांचे मान्यतेने//

( मनोज पगारे )
सहाय्यक पोलीस आयुक्त( प्रशासन )
पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.कक्ष-५/पोकनि/पोलीस उपहारगृह/भाडेतत्वावर/२०२४/ 18751 छत्रपती संभाजीनगर दिनांक २५/११/२०२४

## जाहिरात

पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर या कार्यालयाच्या आस्थापनेवरील पोलीस उपहारगृह भाडेतत्वावर देणेकामी उपहारगृह / केटरिंग व्यवसायाचे परवानाधारक अनुभवी व्यक्ती / संस्था यांचे कडून नव्याने सिलबंद दरपत्रके दिनांक २५/११/२०२४ ते २९/११/२०२४ या कालावधित कार्यालयीन वेळेत मागविण्यात येत आहेत. पुरवठादार व्यक्ती / संस्था यांनी लिफाफ्यावर पोलीस आयुक्त कार्यालयातील उपहारगृहासाठी दरपत्रक नमुद करणे तसेच स्वत:चे / संस्थेचे नांव नोंदवणे आवश्यक आहे. पुरवठादारास स्व:त/संस्थेचे पॅन कार्ड / जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच सदरचे दरपत्रके पोलीस आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथील मुख्य प्रवेशव्दारवरिल निविदा पेटीत सिलबंद करुन टाकावे. सदरची प्राप्त दरपत्रके दिनांक ०२/११/२०२४ रोजी उघडण्यात येईल.

**नियम व अटी:-**

पोलीस आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील प्रशासकीय इमारतीमधील पोलीस कल्याण उपक्रमाअंतर्गत पोलीस उपहारगृह चालविणेकामी बांधकाम केलेल्या जागेचा वापरा करिता बांधकाम केलेले पोलीस उपहारगृह ज्याचे चटई क्षेत्रफळ १५२.७६ Sq.Mt. असे आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी उपहारगृहाच्या जागेचे भाडे दरमहा रुपये २३२६१/- अधिक मनपा कर ठरवले आहे.

01. निविदा धारकास पोलीस आयुक्त छत्रपती संभाजीनगर कार्यालयातील उपहार गृहाची जागा दरमहा रुपये २३२६१/- अधिक मनपा कर या दराने चालवणेसाठी ११ महिनेसाठी कराराचे आधार जागा उपहारगृह चालविण्या साठी दिली जाईल.
02. पुरवठादारांना कॅन्टीन स्वत: चालवावी लागेल, Subletting / Subcontract देता येणार नाही.
03. कराराचा कालावधी ११ महिने राहील काही तातडीच्या कारणाने निविदाधारकास किंवा या कार्यालयास जागा सोडावयाची असल्यास किंवा सोडवुन घ्यावयाची असल्यास एक महिने पुर्व सुचना देणे/ कळविणे बंधकारक राहील.
04. निविदाधारक यांनी ज्या परिस्थितीत जागा वापरासाठी घेतली आहे त्या परिस्थितीत ठेवुन कराराअंती परत खाली करुन देतील तसेच आतील बांधकामात कोणतेही फेरबद्दल, मोडतोड किंवा अन्य बांधकाम करणार नाहीत.
05. निविदाधारकास जागेवर कोणत्याही हक्क असणार नाही व वेळोवेळी पर्यवेक्षी अधिका-यांच्या जागा निरीक्षणास हरकत घेता येणार नाही.
06. निविदाधारक त्यांचा वापरात असलेल्या विघुत जोडणी ग्राहक क्र.४९००१८४९५७९९ चे बील, मनपा कर व अन्य शासकीय व निमशासकीय कर स्वत:च दरमहाच्या ५ तारखेच्या आत पोलीस आयुक्त कार्यालयात जमा करतील.
07. निविदाधारकआपल्या कडील सामानाची सुरक्षिततेची जबाबदारी स्वत:च घेतील इतर शेजारी यांना त्यांच्याकडून त्रास होणार नाही यांची खबरदारी घेतील.
08. पोलीस उपहारगृह मध्ये कार्यरत असलेल्या सर्व कामागारांच्या स्वास्थ्याची / अपघाती हानी झाल्यास त्यांची जबाबदारी निविदाधारकावर राहील.
09. निविदाधारक यांना दिलेल्या जागेच्या मालकी हक्कास कोणत्याही प्रकारे आव्हान/दावा करणार नाही व त्याबाबत त्यांना कोणताही अधिकार राहणार नाही.
10. कॅन्टीन मधील फर्निचर, तसेच किचन मधील उपलब्ध साहित्य / उपकरणे यांची मोडतोड करु नये. त्या सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी पुर्णत: निविदाधारक यांची असेल. खराब झालेल्या फर्निचर साहित्य, किचन मधील साहित्य/